# प्रेस नोट

**शिष्यवृत्ती**

**"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना"**

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या इयत्ता १० वी पास झालेल्या गुणवत्ता यादीतील ९०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक सर्व विद्यार्थ्यांना बार्टी मार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने व्यावसायिक उच्च शिक्षण पूर्व तयारी करिता प्रोत्साहनपर पुरस्कार.**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील इयत्ता १० वी च्या परीक्षेत ९०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक उच्च शिक्षणाची पूर्वतयारी करण्यासाठी ११ वी व १२ वी या दोन वर्षात प्रत्येकी १ लाख प्रमाणे एकूण दोन लाख रुपयांचे विशेष अनुदान योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने "**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना**" राबविण्यात येत आहे. सदरील योजना MH-CET,NEET,JEE, मेडिकल, इ. सारख्या परीक्षेच्या पूर्व तयारी साठी अनुसूचित जातीतील गुणवंत तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी असून ज्या विद्यार्थीचे पालक दारिद्र्य रेषेखालील किंवा ज्यांचे वार्षिक उत्पन्न रक्कम २,५०,०००/- (अक्षरी दोन लाख पन्नास हजार रुपये) पेक्षा कमी आहे व मुख्यता लाभ हा त्याच विद्यार्थ्यांसाठी असेल ज्यांचे पालक असंघटीत क्षेत्रात, कमी पगारावर, कंत्राटी पद्धतीने कामे करतात.

सन -२०२१ इयत्ता १० वी च्या निकालानंतर जाहिरात देऊन विद्यार्थ्यांकडून बार्टी वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील तसेच संबंधीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांना "बार्टी " मार्फत प्रपत्र पाठवून कागदपत्रे प्राप्त करून घेण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी SSC ,CBSE ,ICSE बोर्डामध्ये मध्ये ९०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण असणे बंधनकारक आहे.ज्या विद्यार्थ्यांचे आई - वडील शासकीय नोकरीत आहेत ते विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती करीता पात्र राहणार नाही. सदर योजना ही **सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात व यापुढे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना हा लाभ देय असेल.**

**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था,बार्टी पुणे.**